# ECHO OF HIS CALL

# बोलाविण्याचा प्रतिध्वनी

**MARATHI**

1969 to 2029 REACHING NATIONS ECHO OF HIS CALL SINCE 1969

*India's National Spiritual Newspaper*

₹ 10/-

Published monthly in ENGLISH, TAMIL, MALAYALAM, TELUGU, HINDI, KANNADA, MARATHI, BENGALI, GUJARATI, ODIYA, ASSAMESE, PUNJABI, NEPALI, URDU, SINHALA & AFRIKAN

**Editor : S. SAM SELVA RAJ** | **16 Languages** | **Associate Editor : Rev. SHAUL BENJAMIN SHINDE**

**VOL: XXVIII** **YEAR OF OUR LORD JESUS CHRIST, 2026 JUNE** **No. 05**


## पवित्र शास्त्र

कृपया हा शास्त्र भाग पाठ करा

यशया ५४:१३-१७

१३. आणि तुझी सर्व मुले यहोवाने शिकवलेली होतील आणि तुझ्या मुलांचे अत्यंत कुशल होईल.

१४. तू न्यायीपणात स्थापित होशील, जाचापासून तू दूर राहशील, कारण तू भिणार नाहीस, आणि भीतीपासून तू दूर राहशील, कारण ती तुझ्याजवळ येणार नाही.

१५. पाहा, कोणीएक लोकांस एकत्र जमवील, परंतु माझ्याकडून नव्हे; जो कोणी तुझ्याविरुद्ध लोकांस एकत्र जमवील, तो तुझ्याकडून पडेल.

१६. पाहा, जो अग्नीचे निखारे फुंकतो, आणि त्याच्या कामासाठी हत्यार घडतो तो लोहार मी अस्तित्वात आणला आहे, आणि नाश करायला नासाडी करणाराही मी अस्तित्वात आणला आहे.

१७. जे कोणतेही हत्यार तुझ्याविरुद्ध चालवायला घडलेले आहे ते साधणार नाही; आणि जी प्रत्येक जीभ न्यायात तुझ्याविरुद्ध वाद करायला उठेल ती तू अन्यायी ठरवशील, हाच यहोवाच्या सेवकांचा वाटा आणि हेच माझ्यापासून त्यांचे न्यायीपण आहे, असे यहोवा म्हणतो.

## देव इतरांना तुमचे नुकसान करू देणार नाही!

## GOD WILL NOT ALLOW OTHERS TO HARM YOU!

*- सिस्टर अँजेलिन*



जगभरातील आपल्या सर्व बंधू-भगिनींना आपला प्रभू आणि तारणारा येशू ख्रिस्त यांच्या अद्भुत नावामध्ये शुभेच्छा. **एको ऑफ हिज कॉल** या मासिकाच्या माध्यमातून पुन्हा एकदा तुमच्याशी जोडले जात असल्यामुळे मला अतिशय आनंद होत आहे. शांती आणि सांत्वनाचा देव आपल्या प्रत्येकाला सदैव मार्गदर्शन करो!

अलीकडेच, याकोबाच्या जीवनाबद्दल मी वाचत होते, आणि ह्या वचनाने माझे मन हेलावून गेले: "**.......तुमच्या बापाने मला फसवले व माझे वेतन दहा वेळा पालटले; तरी देवाने त्याला माझे वाईट करू दिले नाही**" - उत्पत्ती ३१:७



*देवाने त्याला माझे नुकसान करू दिले नाही!*

किती सामर्थ्यशाली आश्वासन आहे हे! या शब्दांवर केवळ मनन केले तरी, देवाने मनुष्याला माझे नुकसान करू दिले नाही, किंवा सैतानाला माझ्या व माझ्या कुटुंबाविरुद्ध यशस्वी होऊ दिले नाही, यामुळे किती मोठे समाधान व सांत्वन मिळते. मी प्रार्थना करतो की तुम्ही सुद्धा या अभिवचनावर स्वत:साठी दावा कराल.

(...पान ३ वर)


एको आफ हिज कॉल



खिस्ती यूट्यूब चॅनल!

पास्टर सॅम सेल्वा राज यांच्यातर्फे

प्रतिदिन २ मिनिटांचा संदेश!

इंग्रजी आणि हिंदी भाषेत - प्रात: १ वाजता

तमिळ आणि तेलुगू भाषेत - प्रात: २ वाजता

आणि

तमिळ आणि इंग्रजीत संदेश आणि प्रार्थना

रविवारी सकाळी ८:३० आणि संध्याकाळी ६ वाजता

जर तुम्हाला आशीर्वाद मिळाला असेल, तर कृपया सदस्यता घ्या! ज्यांच्यावर तुम्ही प्रेम करता व काळजी करता त्यांच्यासोबत हे शेअर करा!!

ECHO OF HIS CALL - (Marching towards 60th year)
Estd. 1969



## तुमच्या अतिप्रिय बंधु कडून...

**"....म्हणजे तुझी कोठारे समृद्धीने भरतील, आणि तुझी कुंडे नव्या द्राक्षारसाने भरून वाहतील" - नीतिसूत्रे ३:१०.**



### आमचे कार्याविषयीचे धोरण

आम्ही समकालीन पीढीला पुरातन आणि आरंभीच्या प्रेषितांची शिकवण तीची प्रखरता कमी न करता स्पष्ट करावी आणि शिकवावी ही काळाची गरज आहे.

HON. EDITOR-IN-CHIEF
Rev. Dr. Angeline S. Kumari, M.A., M.Sc., M.Ed.
EX MANAGING EDITOR
Pastor Alex Samson Sam, B.Th., M.Div.
GENERAL MANAGER
Bro. N. Prakasam, M.A., M.Sc.(C&P), PGDHRM, MBA.
ADMINISTRATION
Sis. Jesy Veena Sam
Adv. K. Puratchivendan, M.Com., C.A., B.L.
Dr. P.E.R. Premchand, M.Sc., M.A., M.Ed., Ph.D.
Dr. C.G.S. Baburao, B.Tech., M.Tech. (DM), Ph.D.
Dr. Rabinder Boaz, M.S. (CMC)
EDITORIAL BOARD
Dr. Serena Bevin, M.A., M.Phil., B.Ed.
Sis. Sajini Cherian
Rev. Dr. K.R. Rajasekaran
Rev. Dr. William Robert, Ph.D., DD, D.Lit.

EDITOR, PUBLISHER & PRINTER
Pastor S. SAM SELVA RAJ
Echo of His Call Printers
10, Mohammed Abdullah 2nd Street,
Chepauk, Chennai- 600 005, India.
Phone : (+ 91- 44) 2852 8282, 2852 9293, 2854 7766
Cell : (+91) 98410 71852, 98412 71858, 95661 31858
E.MAIL
sam@echoofhiscall.org
biblecor@yahoo.co.in
WEBSITES
www.echoofhiscall.org
www.stpaulsmatriculation.org
YOUTUBE CHANNEL
Echo of His Call

प्रभुमधील माझ्या प्रियजनहो,

आपल्या प्रभू व तारणारा येशू ख्रिस्त याच्या गौरवशाली नावात तुम्हाला शुभेच्छा!

सध्या आमच्या सेवाकार्यातील प्रत्येक क्षेत्रात आम्ही आत्म्यांची मोठी कापणी होताना पाहत आहोत, कारण अनेक लोक आमच्या **नहेम्या बायबल कॉलेजेस, सेंट पॉल्स मॅट्रिक्युलेशन स्कूल** आणि **मंडळ्यांच्या** सेवेद्वारे आपला प्रभू येशू ख्रिस्त याचा अनुभव घेत आहेत.

१७ एप्रिल ते २१ एप्रिलदरम्यान आमच्या **सेंट पॉल्स मॅट्रिक्युलेशन स्कूलमध्ये व्हेकेशन बायबल स्कूल** आयोजित करण्यात आले होते, ज्यामध्ये अनेक मुलांनी सहभाग घेतला. मुलांना शिकवण्यासाठी आणि त्यांना प्रभूच्या मार्गावर आणण्यासाठी अनेक भाऊ आणि बहिणी पुढे आले. हा एक मोठा आशीर्वाद होता.

५ ते १० मे दरम्यान आमच्या चेपॉक येथील मुख्य मंडळीत तसेच ११ ते १७ मे दरम्यान बालाजी नगर आणि वेलाचेरी येथील शाखा मंडळ्यांमध्येही **व्हेकेशन बायबल स्कूल**



*सेंट पॉल मॅट्रिक्युलेशन स्कूलमधील शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचारीवर्ग.*



*आमच्या संतोषपुरम चर्चमधील मुलांसाठी आयोजित केलेले व्हेकेशन बायबल स्कूल.*

Our Ministries: ECHO OF HIS CALL Monthly Magazines (16 languages) ▫ BIBLECOR - Postal Courses (3 languages) ▫ YouTube Ministry ▫ Online Courses ▫ Theological Correspondence Courses (2 languages) ▫ Church Planting ▫ Nehemiah Bible Colleges ▫ Gospel Printing Press ▫ Great Commission Partners ▫ St. Paul's Matriculation School ▫ Crusades ▫ Community Development

आयोजित करण्यात येणार आहे.

शासकीय आदेशानुसार आमची शाळा जूनच्या दुसऱ्या आठवड्यात पुन्हा सुरू होईल. कृपया या शैक्षणिक सेवाकार्यासाठी, विशेषतः आमच्या विद्यार्थ्यांसाठी, शिक्षकवर्गासाठी व इतर कर्मचाऱ्यांसाठी प्रार्थना करा.

आमचे **नहेम्या बायबल कॉलेजेस** १ जून २०२६ रोजी पुन्हा सुरू होतील. येथे तमिळ, इंग्रजी आणि हिंदी भाषांमध्ये शिक्षण दिले जाते.

शैक्षणिक वर्ष २०२५-२०२६ साठी वर्ग ३० मे रोजी समाप्त होतील, आणि पदवीदान समारंभ ४ जुलै २०२६ रोजी सायंकाळी ५:०० वाजता एम.आर.सी. हॉल, बालर कल्वी निलयम, रिथरडन रोड, पुरसावलकम येथे आयोजित करण्यात येईल.

कृपया आमच्या सहकाऱ्यांसाठी आणि सेवेतील गरजा पूर्ण होण्यासाठी प्रार्थना करा. आम्ही तुमच्या प्रतिक्रिया आणि सूचनांचे मनःपूर्वक स्वागत करतो.

देवाची कृपा तुम्हा सर्वांवर असो. आमेन!

येशू ख्रिस्तामधील तुमचा सेवक,

**पास्टर एस्. सॅम सेल्व राज,**
E.mail: sam@echoofhiscall.org

(पान १ वरून...)

देवाने कोणालाही माझे नुकसान करू दिले नाही!

हे एका अशा माणसाविषयीचे अत्यंत मार्मिक विधान आहे, ज्याने एकेकाळी आशीर्वाद मिळविण्याच्या प्रयत्नात आपल्या भावाला फसवले, आपल्या वडिलांना भ्रमित केले आणि इतरांनाही धोका दिला. तरीसुद्धा, याकोबाच्या जीवनात काहीतरी विलक्षण घडले. तो मानवी युक्त्या वापरून आशीर्वाद मिळविण्याचा प्रयत्न करणारा मनुष्य राहिला नाही, तर खऱ्या आशीर्वादासाठी देवाशी झुंज देणारा मनुष्य बनला.

याकोबाची कथा खरोखरच अत्यंत मनोवेधक आहे. ही अशी एक यात्रा आहे, जिथे फसवणूक करणारा स्वतः फसवला जातो, आणि जो एकेकाळी कपटाने वागत होता तो शेवटी नम्र बनविला जातो. याकोबाचे दोष, अपयश आणि संघर्ष असूनही देव त्याच्याबरोबर राहिला. देवाने याकोबाच्या चुका आणि अपूर्ण निवडींतूनही आपला उद्देश पूर्ण करणे सुरूच ठेवले.

जेव्हा आपण उत्पत्ती ३१ वाचतो, तेव्हा आपल्याला एक सामर्थ्यशाली सत्य दिसून येते: देव आपली योजना पूर्ण करण्यासाठी कोणत्याही परिस्थितीचा उपयोग करू शकतो.

याकोब पळत असताना, संघर्ष करीत असताना किंवा भीतीपोटी वागत असतानाही देव त्याला मार्गदर्शन करीत होता, त्याचे संरक्षण करीत होता आणि त्याचे भविष्य घडवीत होता. त्याच्या दृष्टीआड काहीही नाही.

जर आपण याकोब याच्या जीवनाकडे बारकाईने पाहिले, तर आपल्याला एक हुशार, चतुर आणि योजनाबद्ध मनुष्य दिसतो. परिस्थितींना आपल्या बाजूने वळवून घेण्याची कला त्याला अवगत होती. त्याने आपल्या भाऊ एसाव याचा जन्मसिद्ध हक्क मिळवला आणि फसवणुकीद्वारे आपल्या वडिलांचा आशीर्वादही मिळवला. याकोब याला वाटत होते की तो स्वतःच्या प्रयत्नांनी देवाची कृपा प्राप्त करू शकतो, परंतु नंतर त्याला समजले की खरा आशीर्वाद केवळ देवाकडूनच मिळतो, मानवी प्रयत्नांमधून नाही.

म्हणून देव त्याला शुद्ध करू लागला; सौम्यपणे नव्हे, तर अग्नीत तावून सुलाखून निघणाऱ्या सोन्यासारखे. जोपर्यंत तो पूर्णपणे खचून जाऊन आक्रोश करू करीत नाही, तोपर्यंत त्याला फसवणूक, कठीण प्रसंग, भय आणि संघर्ष यांचा अनुभव घेऊ दिला : "**.........तू मला आशीर्वाद दिल्यावाचून मी तुला जाऊ देणार नाही**". – उत्पत्ती ३२:२६.



*मी तुला जाऊ देणार नाही.*

हे परिवर्तन एका रात्रीत घडले नाही. देवाने याकोबाला एका दीर्घ आणि कठीण प्रवासातून घेऊन गेला. तरीही, या सर्वांत देवाचे नियंत्रण होते. त्याने मनुष्यांच्या योजनांना याकोबाचा नाश करू दिला नाही, कारण त्याची योजना याकोबाच्या चुकांपेक्षा कितीतरी महान होती.

## अत्यंत महत्त्वाची सूचना!




नजीकच्या भविष्यात **एको ऑफ हिज कॉल**च्या पोस्टल डिस्पॅचमध्ये अपरिहार्य व्यत्यय येऊ शकतात. जर आपल्याला कोणताही व्यत्यय न येता **एको ऑफ हिज कॉल** प्राप्त करणे सुरू ठेवायचे असेल तर कृपया आम्हाला आपले नाव, पत्ता, ईमेल आणि व्हॉटस एप नंबर याची माहिती पत्राद्वारे, ईमेल, फोन कॉल किंवा एस एम एस/व्हॉटस एप संदेशाद्वारे तावडतोब पाठवा.

तुमच्या पाठिंब्यामुळे आम्हाला तुमची चांगली सेवा करण्यास मदत होते!

**आमचा पत्ता:**

**एको ऑफ हीज कॉल**
**१०, मोहम्मद अब्दुल्ला २ री गल्ली, चेपॉक, चेन्नई-६०००००५, भारत**
**Cell: (+91) 98412 71858 / 98410 71858 E.mail: sam@echoofhiscall.org**

### १. जेव्हा माणसे कट रचतात, तेव्हा देव त्यांना निष्फळ ठरवतो!

याकोबाच्या जीवनातून आपल्याला एक गहन धडा शिकायला मिळतो. आपल्या वडिलांना आणि भावाला फसवल्यानंतर याकोबाला वाटले की त्याने आपले भविष्य सुरक्षित केले आहे. परंतु देव त्याला एक अधिक खोल सत्य शिकवू इच्छित होता: ''खऱ्या आशीर्वादाचा स्रोत मीच आहे.''



*माझे वेतन दहा वेळा पालटले.*

हे शिकण्यासाठी, याकोब आपला मामा लाबान याच्याबरोबर राहिला, ज्याने याकोबाला त्याच्याच कर्माची चव चाखावयास लावली. शास्त्रवचन आपल्याला सांगते की लाबानाने ''...... **माझे वेतन दहा वेळा पालटले;.....**''.- उत्पत्ती ३१:७. त्याने याकोबाला फसवण्याचा, त्याला धोका देण्याचा आणि त्याचा फायदा घेण्याचा प्रयत्न केला.

देवाने हे सर्व एका उद्देशाने होऊ दिले, जेणेकरून याकोबाला फसवले जाण्याची वेदना समजावी आणि मानवी प्रयत्नांपेक्षा देवावर अवलंबून राहण्याचा धडा त्याला शिकता यावा.

तरीही, या शुद्धीकरण प्रक्रियेदरम्यानसुद्धा, देवाने एक मर्यादा घालून दिली. एक अशी मर्यादा होती जी लाबान ओलांडू शकत नव्हता. म्हणूनच, याकोब आत्मविश्वासाने म्हणाला : ''.......**देवाने त्याला माझे वाईट करू दिले नाही**''. -उत्पत्ती ३१:७.

यातून एक सामर्थ्यशाली सत्य प्रकट होते: देवाच्या मुलांविरुद्धच्या प्रत्येक योजनेला एक दैवी मर्यादा असते.

- मनुष्याच्या प्रत्येक योजनेला देवाने घालून दिलेली एक मर्यादा असते.
- त्याच्यावर होणारा प्रत्येक हल्ला त्याच्या अधिकाराने मर्यादित केला जातो.
- म्हणूनच आपण आजपर्यंत टिकून आहोत. प्रभूची स्तुती असो!

***यशया ५४:१७ हे वचन आपल्याला आठवण करून देते:***

''**जे कोणतेही हत्यार तुझ्याविरुद्ध चालवायला घडलेले आहे ते साधणार नाही;............**''

हत्यारे घडवली जाऊ शकतात
हल्ले होऊ शकतात.

तुमच्या कुटुंबाविरुद्ध, वैवाहिक जीवनाविरुद्ध, व्यवसायाविरुद्ध, सेवाकार्याविरुद्ध किंवा तुमच्या पाचारणाविरुद्ध योजना आखल्या जाऊ शकतात.

परंतु जोपर्यंत आपण प्रभूबरोबर विश्वासूपणे आणि निकटतेने चालत राहतो, तोपर्यंत शेवटी कोणतीही गोष्ट आपल्या विरुद्ध यशस्वी होणार नाही.

जेव्हा माणसे कट रचतात, तेव्हा देव त्यांना निष्फळ ठरवतो.

### २. देव दृश्य आणि अदृश्य अशा दोन्ही गोष्टींपासून आपले संरक्षण करतो!

आपण अनेकदा दृश्य धोक्यांविषयी साक्ष देतो. पण देव ज्या अगणित अदृश्य धोक्यांपासून आपले रक्षण करतो, ते आपण विसरतो.

लाबानाने याकोबाचे वेतन पालटले याविषयी याकोबाने सांगितले पण त्यात अनेक छुपे धोके होते. तो म्हणाला:



*जनावरांनी प्राण्यांचे तुकडे केले.*

''**जनावरांनी फाडलेले ते मी तुझ्याकडे आणले नाही, ते निकसान मी भरून दिले;** ..........'' - उत्पत्ती ३१:३९.

जर जंगली प्राण्यांनी कळपावर हल्ला केला असता, तर याकोबाचा सुद्धा जीव धोक्यात आला असता. चोर, जंगली पशू आणि रात्रीचे हल्ले यांसारखी अनेक संकटे होती, तरीही देवाने त्याचे रक्षण केले.

याकोबाला प्रत्येक संकटाची जाणीव नव्हती, परंतु देवाने ती सर्व निष्फळ ठरवली.

प्रभू त्याच्या जीवनातील प्रत्येक गोष्टीवर शांतपणे लक्ष ठेवून होता.

''**यहोवा सर्व वाईटापासून तुझे रक्षण करील,** .........'' स्तोत्र १२१:७.

आपण आपल्या प्रियजनांवर प्रत्येक वेळी लक्ष ठेवू शकत नाही, पण देव ठेवू शकतो.

त्याने आपल्याला किती अदृश्य धोक्यांपासून वाचवले आहे?

आपल्याविरुद्ध रचलेले असे किती सापळे आहेत जे आपल्या लक्षातच आले नाहीत?

त्याच्या दयेने आपल्याला राखले आहे.

स्तोत्र १३९ आपल्याला स्मरण करून देते की देवापासून काहीही लपलेले नाही.

आपल्या प्रार्थनांना काहीच प्रतिसाद मिळत नाही असे जरी आपल्याला वाटत असले, तरी त्याच्या परिपूर्ण समयानुसार(कैरोस) देव पडद्यामागे कार्य करीत असतो.

जरी देव कार्य करीत असल्याचे आपण पाहू शकत नसलो, तरी तो आपल्यावर लक्ष ठेऊन असतो.

### ३. देव मानवी निर्णयांवर अधिराज्य गाजवतो!

प्रिय देवाच्या मुला, लोक तुमच्या जीवनाविषयी अनेक योजना आखू शकतात, परंतु प्रत्येक मानवी निर्णयावर अधिराज्य गाजवण्याचे सामर्थ्य देवामध्ये आहे.

याकोबाच्या जीवनात, लाबानाने बारंवार अटी बदलल्या - पण प्रत्येक वेळी, देवाने त्याच्यामुळे होणारा परिणाम बदलला.

(...पान ६ वर)

GREAT COMMISSION PARTNERS

ECHO OF HIS CALL MINISTRIES SINCE 1969

# महान सेवाकार्याचे भागीदार प्रार्थना विनंत्या

स्तुती आणि प्रार्थनेचे विषय - १९ जून, २०२६ पासून ते १८ जुलै, २०२६

ओझी वाहणे (गलती ६:२), गरजा भागविणे (रोम १२:१३), आणि कार्यास गती देणे (२ तिमथी १:६)

**(कृपया हे पान बाजूला काढून, सतत प्रार्थना करण्याकरिता तुमच्या पवित्र शास्त्रात ठेवा)**

## याकरीता देवाची स्तुती करा...

१९ जून- आमच्या **एको ऑफ हिज कॉल** या मासिकाचे १६ भाषांमध्ये वेळेवर प्रकाशन करण्यासाठी विश्वासूपणे सहकार्य करणारे समर्पित सहाय्यक संपादक देवाने आम्हाला आशीर्वादरूपाने दिले आहेत यासाठी देवाची स्तुती करा.

२० जून- निवासी आणि सायंकालीन **नहेम्या बायबल कॉलेजेससाठी** विद्यार्थ्यांची नोंदणी करण्याच्या आमच्या प्रयत्नांना देव आशीर्वाद देत आहे यासाठी देवाची स्तुती करा.

२१ जून- १९६९ पासून मासिक सेवेप्रती असलेल्या आमच्या वचनबद्धतेवर देवाच्या निरंतर आशीर्वादाबद्दल त्याची स्तुती करा.

२२ जून- १० एप्रिल २०२६ रोजी आयोजित **सेंट पॉल्स मॅट्रिक्युलेशन स्कूलचा** वार्षिक दिन आणि बालवाडी पदवीदान समारंभ देवाने आशीर्वादित केले यासाठी त्याची स्तुती करा.

२३ जून- आमच्या हितचिंतकांच्या प्रार्थनापूर्ण पाठवळाबद्दल व आर्थिक सहकार्याबद्दल देवाची स्तुती करा.

२४ जून- **सेंट पॉल्स मॅट्रिक्युलेशन स्कूलला** शैक्षणिक वर्ष २०२५-२०२६ यशस्वीरित्या पूर्ण करण्यामध्ये देवाने आशीर्वादित केले यासाठी देवाची स्तुती करा.

२५ जून- **एको ऑफ हिज कॉलची** मुख्य मंडळी आणि त्याच्या शाखीय मंडळींच्या नेत्यांचा आणि विश्वासणाऱ्यांचा आशीर्वाद लाभला यासाठी देवाची स्तुती करा.

२६ जून- देवाच्या आशीर्वादामुळे आमच्या सायंकालीन **नहेम्या बायबल कॉलेजेसनी** शैक्षणिक वर्ष २०२५-२०२६ यशस्वीरित्या पूर्ण केले यासाठी देवाची स्तुती करा.

२७ जून- आमची मुख्य मंडळी, तसेच आमच्या शाखीय मंडळ्यांद्वारे आयोजित करण्यात आलेल्या व्हेकेशन बायबल स्कूलला देवाने आशीर्वादित केले यासाठी देवाची स्तुती करा.

२८ जून- आमच्या प्रार्थनेतील सहभागीदार, सदस्यत्व घेतलेले सहभागीदार, विश्वासामधील सहभागीदार, जीवनभर सोबत करणारे सहभागीदार, महान सेवाकार्याचे सहभागीदार, विनंती अर्ज पाठविणारे सहभागीदार आणि त्यांचे कुटुंबीय या सर्वांसाठी देवाची स्तुती करा.

२९ जून- आमच्या **एको ऑफ हिज कॉल** युट्युब वरील तमिळ, तेलुगू, इंग्रजी आणि हिंदी भाषांतील संदेशांना देवाने आशीर्वादित केले यासाठी देवाची स्तुती करा.

३० जून- आत्तापर्यंत सेवाकार्य टिकवून ठेवण्यात आणि चालविण्यात आमच्या सर्व प्रयत्नांना देवाने फलदायी बनविले यासाठी देवाची स्तुती करा.

०१ जुलै- आमच्या **एको ऑफ हिज कॉल** कर्मचाऱ्यांना आणि त्यांच्या कुटुंबीयांना देवाने आशीर्वादित केले आणि त्यांचे संरक्षण केले यासाठी देवाची स्तुती करा.

०२ जुलै- युवक आणि बालकांच्या हितासाठी आमच्या **ग्लोबल व्हिजन फॉर यूथ आणि किड केअर** सेवाकार्यास देवाने आशीर्वादित केले यासाठी देवाची स्तुती करा.

०३ जुलै- १६ मे २०२६ रोजी आयोजित करण्यात आलेल्या आमच्या **नहेम्या बायबल कॉलेजच्या** माजी विद्यार्थ्यांच्या स्नेहसंमेलनाला देवाने आशीर्वादित केले यासाठी देवाची स्तुती करा.

## कृपया यासाठी प्रार्थना करा...

०४ जुलै- जगभरातील असाध्य आजार आणि नैराश्याने ग्रस्त लोकांच्या मुक्ततेसाठी कृपया प्रार्थना करा.

०५ जुलै- या महिन्यातील सर्व आर्थिक गरजांची तरतूद व्हावी यासाठी कृपया प्रार्थना करा.

०६ जुलै- अंमली पदार्थांच्या व्यसनाधीन झालेल्या आणि शाळा-कॉलेजला अनियमितपणे उपस्थित राहणाऱ्या मुला-मुलींना व युवकांना मुक्तता मिळावी यासाठी कृपया प्रार्थना करा.

०७ जुलै- जगभरात आयोजित करण्यात आलेल्या व्हेकेशन बायबल स्कूलच्या वर्गादरम्यान तारण मिळालेल्या मुलां-मुलींसाठी व युवकांसाठी कृपया प्रार्थना करा.

०८ जुलै- शैक्षणिक वर्ष २०२६-२०२७ साठी **सेंट पॉल्स मॅट्रिक्युलेशन स्कूलमध्ये** नवीन विद्यार्थ्यांच्या प्रवेशासाठी कृपया प्रार्थना करा.

०९ जुलै- शैक्षणिक वर्ष २०२६-२०२७ साठी आमच्या निवासी आणि सायंकालीन नहेम्या बायबल कॉलेजेसमध्ये पात्र विद्यार्थ्यांच्या प्रवेशासाठी कृपया प्रार्थना करा.

१० जुलै- दुर्गम भागांमध्ये, जिथे सुवार्ता पोहोचलेली नाही अशा लोकांमध्ये सुवार्ता पसरवणाऱ्या धर्मप्रसारकांना दैवी संरक्षण मिळावे यासाठी कृपया प्रार्थना करा.

११ जुलै- पालकांना त्यांच्या मुलांचे आणि तरुणांचे संगोपन करण्यासाठी दैवी मार्गदर्शन लाभावे यासाठी कृपया प्रार्थना करा.

१२ जुलै- तरुण पिढीसाठी प्रार्थना करण्याकरिता आमच्या **ग्लोबल व्हिजन फॉर यूथ आणि किड केअर** सेवाकार्यात अधिक लोकांनी सहभागी व्हावे यासाठी कृपया प्रार्थना करा.

१३ जुलै- एको ऑफ हिज कॉल सेवाकार्यासाठी देवाने अधिक समर्पित सेवक उभे करावेत यासाठी कृपया प्रार्थना करा.

१४ जुलै- जगभरातील सर्व पंथांच्या मंडळ्यांमध्ये संजीवनीचे कार्य व्हावे यासाठी कृपया प्रार्थना करा.

१५ जुलै- आमचे वरिष्ठ पास्टर एस सॅम सेल्वा राज आणि त्यांच्या कुटुंबाचे सर्व प्रकारच्या वाईटापासून देवाने सतत संरक्षण करावे यासाठी कृपया प्रार्थना करा.

१६ जुलै- पृथ्वीवर देवाचे राज्य स्थापित व्हावे यासाठी देवाकडून आम्हाला अधिक मोठे दर्शन प्राप्त व्हावे यासाठी कृपया प्रार्थना करा.

१७ जुलै- जगभर शांतता नांदावी यासाठी कृपया प्रार्थना करा.

१८ जुलै- आमच्या वरिष्ठ पास्टरांच्या आत्मचरित्राचे काम यशस्वीरीत्या पूर्ण व्हावे यासाठी कृपया प्रार्थना करा.

(पान ४ वरुन)

जर देवाने याकोबासाठी हे केले, तर तो तुमच्यासाठीही करू शकतो.

तुमच्या विरोधात कार्य करणाऱ्या परिस्थिती असू शकतात:

- एक निर्णय
- एक निदान
- परीक्षेचा निकाल
- इतरांनी घेतलेला एखादा निर्णय

परंतु देव त्या सर्वांवर अधिराज्य गाजवू शकतो.



*आपल्याला फक्त त्याच्यासमोर येऊन प्रार्थना करण्याची गरज आहे.*

आपल्याला फक्त त्याच्यासमोर येऊन प्रार्थना करण्याची गरज आहे:

***प्रभु, तू माझा पिता आहेस. मी तुझे लेकरू आहे. कृपया मला सहाय्य कर.***

जेव्हा आपण स्वतःला लीन करतो, आपल्या पापांची कबुली देतो आणि त्याची मदत मागतो, तेव्हा तो दया आणि सामर्थ्याने प्रतिसाद देतो.

"......**ज्याने उघडल्यावर कोणी बंद करणार नाही आणि ज्याने बंद केल्यावर कोणी उघडणार नाही.**" – प्रकटी ३:७.

मानवी अधिकार खरा आहे, परंतु देवाचे सार्वभौमत्व अंतिम आहे.

## ४. देव प्रत्येक अन्यायाचे रूपांतर वृद्धीमध्ये करतो!

कधीकधी, आपण विश्वासूपणे जीवन जगत असतानाही जीवन अन्यायकारक वाटू शकते. तेव्हा आपण विचार करू लागतो:



- मी देवाचे भय बाळगतो – मग मी इतरांइतका आशीर्वादित का नाही?
- जे लोक देवाकडे दुर्लक्ष करतात, तेच भरभराट होताना का दिसतात?
- नीतिमान जीवन जगण्यासाठी काही मूल्ये आहेत का?

प्रिय मित्रांनो, जगात जी भरभराट होताना दिसते, ती अनेकदा तात्पुरती असते. परंतु तुम्ही सहन करीत असलेल्या प्रत्येक अन्यायाचा उपयोग देव तुम्हाला बळकट करण्यासाठी, वृद्धिंगत करण्यासाठी आणि उंचावण्यासाठी करील.

***याकोबाकडे पहा:***

जेव्हा लाबान म्हणाला, "ठिपकेदार", तेव्हा देवाने कळप ठिपकेदार केले. जेव्हा तो म्हणाला, "पट्टेदार", तेव्हा देवाने त्यांना पट्टेदार केले.



*जेव्हा लाबान म्हणाला, ठिपकेदार, तेव्हा देवाने कळप ठिपकेदार केले.*

जितके लाबान याकोबावर अत्याचार करीत गेला, तितकेच देव त्याला अधिक समृद्ध करीत गेला.

"......**देवावर प्रीती करणाऱ्यांस म्हणजे त्याच्या संकल्पाप्रमाणे बोलाविलेल्यांस देवाच्या करणीने सर्व गोष्टी मिळून कल्याणकारक होतात.**" – रोम ८:२८.

अन्यायसुद्धा देवाच्या हातातील एक साधन बनते.

जे तुमच्याशी वाईट वागतात, त्यांना घाबरू नका.

जे तुमच्यावर अन्याय करतात, त्यांच्यामुळे निराश होऊ नका.

शत्रू जे वाईटासाठी हेतू ठेवतो, त्याचे देव आशीर्वादात रूपांतर करील.

त्याला घट्ट धरून ठेवा, तो प्रत्येक अन्यायाचे रूपांतर वृद्धीमध्ये करील.

## ५. जेव्हा देव तुम्हाला एखाद्या परिस्थितीतून नेतो, तेव्हा तो तुम्हाला तिच्या शेवटापर्यंतही पोहोचवतो!

जेव्हा याकोब आपल्या जीवाच्या भीतीने वडिलांचे घर सोडून निघून गेला, तेव्हा त्याच्याजवळ देवाच्या अभिवचनाशिवाय दुसरे काहीही नव्हते:

(पान ९ वर)

नहेम्या बायबल कॉलेजेस
चेपॉक आणि संतोषपुरम, वेलाचेरी, चेन्नै
प्रवेशा करिता त्वरा करा !
शैक्षणिक पात्रता : १० वी इयत्ता आणि अधिक
माध्यम : तमिळ (अर्धवेळ)
हिंदी (अर्धवेळ)
ईश्वरविद्या डिप्लोमा & Bachelor of Theology
आंतरराष्ट्रिय ख्रिस्ती पुढाऱ्यांद्वारे आणि वरिष्ट पाळकांद्वारे ५६ वर्षांपासून मान्यता प्राप्त
संपर्क : अध्यक्ष : नहेम्या बाईबल कॉलेज
10, MOHAMMED ABDULLAH 2ND STREET, CHEPAUK, CHENNAI - 600 005, INDIA.
Phone : (+91-44) 2852 8282, Cell : (+91) 98410 71852 / 95661 31858
E.mail : sam@echoofhiscall.org / Website : www.echoofhiscall.org
* ऑनलाईन क्लास उपलब्ध आहे *

## -: आमच्या मुख्यालयातील सेवाकार्या :-

१. प्रार्थना सेवा : २४ तास
२. **एको ऑफ हिज कॉल** : मासिक : इंग्रजी, तामिळ, मल्यालम, तेलगु, हिन्दी, कन्नड, मराठी, गुजराथी, बंगाली, ओरिया, नेपाळी, आसामी, पंजाबी, उर्दु, सिंहली आणि आफ्रिकन
३. **बायबलकोर** : मुळभूत बायबल अभ्यासक्रम (इंग्रजी, तामिळ आणि हिन्दी)
४. पत्रव्यवहाराद्वारे थियॉलॉजीकल अभ्यासक्रम : इंग्रजी आणि तामिळ
५. नहेम्या बायबल कॉलेज : (चेपॉक, संतोषपुरम आणि वेलाचेरी)
६. शाखा चर्च : संतोषपुरम, बालाजी नगर आणि वेलाचेरी
७. महान आज्ञापालनाचे भागीदार : (पाळकांचे नेटवर्क)
८. प्रशिक्षण कार्यक्रम : सेमिनार आणि रीट्रीटो
९. महासभा
१०. छापील साहित्य वाटप आणि पाठ पुरावा
११. शुभवर्तमान साहित्य मुद्रणालय : प्रकाशने
१२. सेंट पॉलस् मॅट्रीक्युलेशन स्कुल : गावातील इंग्रजी माध्यम हायस्कूल
१३. रवीवारी शब्बाथ शाळा : सकाळी १०.३० आणि सायंकाळी३ वाजता-रविवारी (चेपॉक, वेलाचेरी, बालाजी नगर आणि संतोषपुरम)
**१४. सकाळची उपासना : रविवारी सकाळी ५.३० वाजता**
**१५. सुरुवातीची उपासना : रविवारी सकाळी ८.०० वाजता**
**१६. तामिळ उपासना : रविवारी सकाळी ८.३० वाजता**
**१७. युवा सभा : रविवारी दुपारी ११.०० वाजता**
**१८. सहभाग भोजन : रविवारी दुपारी १.०० वाजता**
**१९. तेलगु उपासना : सायंकाळी ५ वाजता - रविवारी**
**२०. हिन्दी उपासना : सायंकाळी ४ वाजता - रविवारी**
**२१. तमिळ आणि इंग्रजी उपासना : सायंकाळी ६ वाजता - रविवारी**
२२. अभिप्रायाची वेळ : सायंकाळी ७.३० वाजता - रविवारी
२३. स्त्रियांची प्रार्थना : सायंकाळी ५.३० वाजता - बुधवारी
२४. पुरुषांची प्रार्थना : सायंकाळी ७ वाजता - शुक्रवारी
२५. शिष्यत्त्वाची सभा : सायंकाळी ६ वाजता - शनिवारी
२६. गृह प्रार्थना सभा : सायंकाळी ६.३० वाजता - मंगळवारी/गुरुवारी
२७. विशेष प्रभु भोजन : पहाटे ६ वाजता प्रत्येक महिन्याच्या १ल्या दिवशी
२८. सेवाकाची समालोचन सभा : सायंकाळी ५.३० वाजता - पहिला शनिवार
२९. पालकांची प्रार्थना : सायंकाळी ४ वाजता - पहिला रविवार
३०. रात्रभर प्रार्थना : सकाळी ९.३० वाजता - तिसऱ्या शुक्रवार
३१. उपवास प्रार्थना : सकाळी ९.३० वाजता - दुसऱ्या शनिवार
३२. पवित्र सहभागिता : दुसऱ्या रविवारच्या उपासनेत
३३. तरुण/तरुणी/लहान लेकरांसाठी प्रार्थना : दररोज रात्री १० वाजता (फोन द्वारा)
३४. कार्यालयीन स्टाफचे मनन : सकाळी ९ वाजता - दररोज
३५. कार्यालय : सकाळी ९ ते रात्री ९ पर्यंत (रविवार वगळून)

## एको ऑफ हिज कॉल

### टपाल द्वारे धर्म शास्त्राचे अभ्यासक्रम

केवळ भारतातील उमेदवारां करीता

### १) बायबलकोर

आम्ही नवीन ख्रिस्ती विश्वासणारे आणि अन्य विश्वासातील लोकांकरिता टपालाद्वारे बायबल मधील पायाभुत सत्यांवर इंग्रजीत ५७ पाने, हिन्दी ७६ पाने आणि तामीळमध्ये ९६ पानांचा अभ्यासक्रम देऊ करीत आहोत. तुम्हाला 'न्यु लाईफ फॉर यू' या शिर्षकाचे अभ्यासक्रमाचे पुस्तक देण्यात येईल! **अभ्यासक्रम पूर्ण केल्यानंतर, तुम्हाला प्रमाणपत्र दिले जाईल. अभ्यासक्रमाकरिता आवश्यक अशी फी आकारली जाणार नाही. तुम्ही आशीर्वादित व्हाल!**

### २) टपालाद्वारे ईश्वर विज्ञान आभ्यासक्रम

हा अभ्यासक्रम सुवार्तिक, ख्रिस्ती पुढारी आणि अशिक्षित सभासद ज्यांना देवाची सेवा करण्याची तीव्र इच्छा आहे, अशा करिता इंग्रजीत ५३७ पानांचा आणि तामिळ भाषेत ६५२ पानांचा अभ्यासक्रम उपलब्ध आहे. अभ्यासक्रमाची १००० रुपये फी आकारली जाते. त्यामध्ये १४९ अध्याय/पाठ समाविष्ट असलेली एकूण ७ पुस्तके देण्यात येतील. '**सर्टिफिकेट इन मिनिस्ट्री**' प्रमाणपत्र देण्यात येईल. देव तुम्हाला आशीर्वाद देईल!

*अधीक माहिती करिता आम्हाला लिहा -*

अध्यक्ष - नहेम्या बाईबल कॉलेज
एको ऑफ हिज कॉल, पोस्ट बॉक्स नं. २९५७,
चिपॉक, चैन्नई - ६०० ००५
फोन : (०४४) २८५२ ८२८२, २८५२ ९२९३,
फोन : ९८४१० ७१८५२, ९५६६१ ३१८५८
E-mail: biblecor@yahoo.co.in

## एको ऑफ हिज कॉल

### मासिक (विनामुल्य) मिळविण्याची उत्तम संधी

तुम्ही तुमच्या मित्रांचे/नातेवाईकांचे पत्ते आमच्याकडे पोस्टाद्वारे, पत्राद्वारे, ई.मेल, वॉटस् ॲप किंवा फोन द्वारे पाठविल्यास, आम्ही त्यांना त्यांच्या पत्त्यावर मासिक विनामुल्य पाठवित जाऊ.

## कर सवलत

**एको ऑफ हिज कॉल एज्युकेशनल ट्रस्ट**ला भारतातील कोणत्याहि एका व्यक्तिद्वारे किंवा संस्थाद्वारे देण्यात येणारी देणगी हि आयकर कायद्याच्या ८० जी कलमा अंतर्गत कर सवलतीस पात्र ठरते. कृपया आपली देणगी डी.डी./धनादेश/मनी आर्डर "**एको ऑफ हिज कॉल एज्युकेशनल ट्रस्ट**" च्या नावाने खालील तपशीलानुसार आम्हाला पाठवा

| | | |
|---|---|---|
| **Account Name** | : | **ECHO OF HIS CALL EDUCATIONAL TRUST** |
| **Account Number** | : | **1023 2923 805** |
| **Bank Name** | : | **STATE BANK OF INDIA** |
| **Branch** | : | **TRIPLICANE, CHENNAI - 600 005** |
| **IFSC Code** | : | **SBIN 0000249** |
| **SWIFT Code** | : | **SBI NIN BB 455** |



# खड्ड्यातून महालापर्यंत

## PIT TO PALACE

**''नाचणाऱ्याने हे ध्यानात आणावे !'' (मत्तय २४:१५)**
**(पास्टर एस. सॅम सेलवाराज यांच्या जीवनातील अनुभव)**

### मला तर ठाऊक आहे की माझा उद्धारक जिवंत आहे.......... - ईयोब १९:२५

माझ्या सेवाकार्याच्या सुरुवातीच्या काळात देवाने अनेक परीक्षा आणि कठीण प्रसंग येऊ दिले. आर्थिक गरजांमुळे मी मोठ्या दबावाखाली होतो. सेवाकार्यासाठी कायमस्वरूपी इमारत उभारण्याची कोणतीही शक्यता नसल्यामुळे मला वारंवार ठिकाणे बदलावी लागत होती. तसेच, माझे निवासस्थान आणि कार्यालयही सतत बदलावे लागत होते.



१९८० साली मी गंभीर आजारी पडलो होतो. अनेक दिवस मला ताप होता आणि संपूर्ण शरीरात वेदना होत होत्या, विशेषतः मानेत तीव्र वेदना होत होती. ज्या ठिकाणी मी सेवाकार्य करीत होतो ते ख्रिस्ती क्षेत्र नव्हते. आजूबाजूच्या लोकांकडून मला कोणतीही मदत मिळत नव्हती आणि त्यांच्यामध्ये मी परका असल्याचे मला वाटायचे. माझ्या आजारपणामुळे आणि एकटेपणामुळे मी फार त्रस्त झालो होतो, म्हणून मी माझ्या एका मित्राला एक रात्र माझ्याबरोबर थांबण्याची विनंती केली. पूर्वी त्याला मी अनेकवेळा मदत केली होती, तरीही त्याने माझ्याबरोबर थांबण्यास नकार दिला. त्या रात्री मला खूप यातना सहन कराव्या लागल्या.


दुसऱ्या दिवशी सकाळी काही लोक आले आणि मला सरकारी रुग्णालयात दाखल करून मला एकटेच सोडून गेले. मी अजूनही त्या आजाराने त्रस्त होतो. अनेक दिवसांनंतर डॉक्टरांनी माझ्यावर शस्त्रक्रिया करण्याचा निर्णय घेतला आणि त्यासाठी सर्व तयारी केली. माझ्या परिस्थितीमुळे मला शस्त्रक्रिया करून घ्यायची नव्हती, म्हणून मी प्रार्थना करण्यास सुरुवात केली. मी देवाला सांगत होतो की, जरी माझ्याकडे सांसारिक सुखसोयी मिळवण्याच्या संधी होत्या, तरीही सेवाकार्यासाठी मला अनेक समस्यांना सामोरे जावे लागत आहे. **जेव्हा मी माझे मार्ग त्याच्यासमोर मांडले, तेव्हा प्रभूने माझे ऐकले.** (स्तोत्र ११९:२६).



एका रात्री, मी प्रार्थना करीत असताना मला देवाच्या स्पर्शाची जाणीव झाली. माझ्या शरीरातून त्या आजारापासून मुक्ती मिळाल्याचे मला जाणवले. मी त्यावर पूर्ण विश्वास ठेवला आणि माझा अनुभव संबंधित डॉक्टरांना सांगितला. तो प्रेमळ होता आणि मला म्हणाला, ''मला माहीत आहे, अनेक ख्रिस्ती लोक 'येशू ख्रिस्ताने आम्हाला बरे केले आहे' असे सांगून उपचार घेण्यास नकार देतात. तुम्हीसुद्धा तेच म्हणत आहात.'' त्याने कोणत्याही शस्त्रक्रियेचा किंवा औषधांचा आग्रह न धरता मला जाऊ दिले. मी देवावर जो विश्वास ठेवला होता, त्यानुसार देवाने माझ्यासाठी कार्य केले.



देवाने मला पूर्णपणे बरे केले. जवळजवळ ४६ वर्षे उलटून गेली आहेत, तरी तो आजार मला पुन्हा कधीच झाला नाही. जरी मला खडबडीत आणि ऊंच-सखल रस्त्यांवर वाहन चालवावे लागत असले, तरी मला पाठदुखी किंवा मानेचा त्रास होत नाही. मी जवळजवळ दिवसातून २० तास काम करतो; मग ते कार्यालयात असो किंवा कुठेतरी प्रचार करीत असो. सहसा मला थकवा जाणवत नाही. देवाने मला केवळ बरेच केले नाही, तर अनेक प्रकारे आशीर्वादितही केले आहे. एकेकाळी फक्त एका मित्राने मला सोडून दिले होते. पण आज देवाने मला जगभरात मित्र दिले आहेत आणि मला व माझ्या सेवाकार्याला आशीर्वादित केले आहे.



प्रिय मित्रांनो, आपला प्रभू येशू ख्रिस्त अतिशय अद्वितीय आहे आणि सर्व गोष्टींहून श्रेष्ठ आहे. जर आपण त्याला आपला खरा मित्र आणि देव मानले, तर तो या अंधकारमय जगात योग्य वेळी योग्य मार्गाने आपले नेतृत्व करील. जर तुम्ही अजूनही तुमच्या वैयक्तिक जीवनात येशू ख्रिस्ताला तुमचा प्रभू आणि तारणारा म्हणून स्वीकारले नसेल, तर आता स्वीकारा आणि त्याची सेवा करण्यास सुरुवात करा. तो निश्चितच तुम्हाला सुरक्षित मार्गाने चालवील. तो माझे दररोज मार्गदर्शन करतो आणि मला खात्री आहे की तो तुमचेही मार्गदर्शन करील.

''........... **मी अरण्यांत सडक करीन, मरुभूमीत नद्या वाहवीन**'' (यशया ४३:१९).

*****************

(पान ६ वरून...)



*.... मी परमेश्वर.....मी तुला आणि तुझ्या संततीला ही भूमी देईन.*

"............**मी परमेश्वर**........... **ज्या भूमीवर तू निजला आहेस ती मी तुला व तुझ्या संततीला देईन**"– **उत्पत्ती २८:१३.**

तो रिकाम्या हाताने, भयभीत अवस्थेत आणि आपल्या भविष्याबद्दल अनिश्चितता घेऊन निघाला.

सुरुवातीला याकोबाचे लाबान याच्या घरात राहणे अनुकूल वाटत होते. पण कालांतराने ते शत्रुत्वात बदलले. लाबान आणि त्याचे पुत्र मत्सराने भरले आणि त्यांचा दृष्टिकोन बदलला.

"**लाबान पूर्वीप्रमाणे आपणावर प्रसन्न नाही असे याकोबाने ताडिले.............. तो पूर्वीप्रमाणे मजवर प्रसन्न नाही,** .........." – उत्पत्ती ३१:२,५.

जरी याकोब संकटांना सामोरा गेला, तरी देव त्याच्याबरोबर होता.

जेव्हा वेळ आली, तेव्हा देवाने म्हटले, 'परत ये'.

जेव्हा लाबान याकोबाला रिकाम्या हाताने परत पाठवण्याचा विचार करत होता, तेव्हाही, देवाने हस्तक्षेप केला.

याकोबाने साक्ष दिली: "**माझ्या पित्याचा देव...... माझा पाठीराखा नसता तर आताही आपण मला रिकामे लावून दिले असते......**" – उत्पत्ती ३१: ४२.

परंतु देवाने तसे होऊ दिले नाही. त्याने सर्व काही पुनर्स्थापित केले आणि आपले अभिवचन पूर्ण केले.

देव त्याच्या वेळेनुसार सर्व गोष्टी सुंदर बनवतो.

*जर तुम्ही प्रतीक्षेत असाल:*

- बढतीसाठी
- प्रगतीसाठी
- एका बदलासाठी

देव तुम्हांला आठवण करून देतो: जेव्हा देव म्हणतो, "आता वेळ आली आहे", तेव्हा कोणालाही तुम्हाला थांबवता येत नाही.

धाडसी व्हा.

बळकट व्हा.

योग्य वेळी देव पुढचे दार उघडील.

प्रिय मित्रांनो, लोक आपल्याविरुद्ध कट रचू शकतात आणि शत्रू आपल्यासमोर सापळे रचू शकतो, परंतु देव त्यांना आपला नाश करू देणार नाही.

आपण त्याच्या वचनांना दृढपणे धरून राहिले पाहिजे: "**तुझ्यावर चढाई करणारे शत्रू तुझ्यापुढे मार खातील असे परमेश्वर करील; .........**" – अनुवाद २८:७.

आपण कोणत्याही परिस्थितीला सामोरे जात असलो तरी, देव आपल्यासोबत आहे. त्याचे वचन आपल्याला स्मरण करून देते: "**नीतिमानाला फार कष्ट होतात; तरी परमेश्वर त्या सर्वांतून त्याला सोडवितो.**" –स्तोत्र ३४:१९.

"**तो माझा धाव करील तेव्हा मी त्याला उत्तर देईन; संकटसमयी मी त्याच्याजवळ राहीन; मी त्याला मुक्त करीन, मी त्याला गौरव देईन.**" – स्तोत्र ९१:१५.

देव आपल्यापासून दूर नाही. तो आपल्यासोबत आहे. प्रत्येक परीक्षेत तो आपल्याबरोबर चालतो आणि आपल्याला त्यातून बाहेर काढतो.

तो तुम्हाला सोडणार नाही.

तो तुम्हाला निराश करणार नाही.

देवाने तुमच्यासाठी तयार केलेल्या नियतीचा नाश करण्यासाठी तो कोणतीही गोष्ट घडू देणार नाही.

त्याचे अभिवचन घट्ट धरून राहा:

"............. **अब्रामा, भिऊ नको; मी तुझी ढाल आहे; तुला मोठे प्रतिफळ मिळेल.**" – उत्पत्ती १५:१.

(वरील वचनात अब्राहामाच्या जागी तुमचे स्वतःचे नाव घाला, त्याचे अभिवचन वैयक्तिक आहे.)

तुमचा महिना आशीर्वादित जावो!

*****************


# नहेम्या बायबल कॉलेज

एको ऑफ हिज कॉल संस्था

(निवासी – हिंदी आणि संध्याकाळ –तमिळ)

**२६ वा पदवीदान समारंभ**

**४ जुलै २०२६, शनिवार, सायं. ५:०० वाजता**



विशेष अतिथी :

**रेव्ह. डॉ. एस. जे. किंग्सले**

(सीओओ, जीसस कॉल्स)

**स्कीडमोर हॉल द्वारे**

**वलार कलवी निलयम, एम.आर.सी. सेंटर,**

**५/६, रिथरडॉन रोड, वेपेरी, चेन्नई – ६०० ००७.**

- शैक्षणिक वर्ष २०२६–२०२७ साठी प्रवेश सुरू झाले आहेत!
- कृपया पात्र विद्यार्थ्यांची शिफारस करा!!
- निवासी पुरुष हिंदी विद्यार्थ्यांसाठी शिष्यवृत्ती उपलब्ध आहे!!!
- शैक्षणिक वर्ष २०२६–२७ चे वर्ग ०१.०६.२०२६ रोजी सुरू होतील!!!!

**प्रार्थना करा आणि सहभागी व्हा!**

Posted at "Egmore RMS Patrika Channel" RNI NO. 70106/98, Postal Regn. No. TN/CH/(C)/206/24-26 WPP NO. TN/PMG(CCR)/WPP-261/24-26

## OUR BANK DETAILS:

### *1. Bank : State Bank of India*

Branch : **Triplicane, Chennai-5**
Name : **S. Sam Selva Raj**
A/C No. : **1023 2934 679**
IFSC : **SBIN 00 00 249**
SWIFT CODE : **SBI NIN BB 455**

### *2. Bank : ICICI Bank*

Branch : **Anna Salai, Chennai-6**
Name : **Echo of His Call**
A/C No. : **6038 0502 2319**
IFSC : **ICIC 000 6038**

### *3. Bank : State Bank of India*

**(This Account is for Tax Exemption for Indians only )**

Branch : **Triplicane, Chennai-5**
Name : **Echo of His Call Educational Trust**
A/C No. : **1023 2923 805**
IFSC : **SBIN 00 00 249**

## OUR QR CODE:

ECHO OF HIS CALL

Scan to pay with any UPI app

**Google Pay: 98410 71858**
**PayPal : SAM SELVA RAJ**
*****
**E.mail : sam@echoofhiscall.org**

# ECHO OF HIS CALL

१७ भाषेत मासिक, बायबल कॉलेज पत्रव्यवहाराद्वारे अभ्यासक्रम मंडळी रोपन कार्य, गावात इंग्रजी माध्यम शाळा, शुभवर्तमान साहित्य मुद्रणालय, महासभा, शिबीर, सामाजिक सेवा इत्यादि.

**वार्षिक वर्गणी : रूपये १००/-      आजीवन वर्गणी : रूपये २०००/-**

एको ऑफ हिज कॉल मिनिस्ट्रीजची विविध सेवा कार्ये तुमच्यासारख्या स्वेच्छा दान आणि देणग्या देणाऱ्या देवाच्या लेकरांनी दिलेल्या आधाराद्वारे करण्यात येतात. या सेवाकार्याकरिता देव तुम्हाला सुचवेल तशा प्रकारे तुम्ही आधार देवू शकता. शुभवर्तमान न पोहंचलेल्या लोकांपर्यंत ते नेण्याकरिता व मंडळ्या रोपन कार्याकरिता आम्हांला तुमच्या मदतीची गरज आहे.

एको ऑफ हिज कॉल मासिक तुम्हांला नित्य नियमाने मिळावे अशी तुमची इच्छा असेल तर कृपया आम्हाला लिहून कळवा. तुमचा पोस्टाचा किंवा ई-मेलचा पत्ता बदलला असेल तर कृपया जुना व नवा पत्ता आम्हांला कळवा.

आमच्या वेब साईटवर देखील १७ भाषेतील मासिक उपलब्ध आहे. तुम्ही साईट वर जाऊन ते वाचू सकता व डाऊन लोड देखील करून आशीर्वादित होऊ शकता.

Your letters, prayer requests and your financial helps **(Money Orders, Cheques or Demand Drafts, NEFT, PayPal (Sam Selva Raj, sam@echoofhiscall.org) PhonePe (98410 71858), Gpay (98410 71858), Western Union, MoneyGram, etc.)** to **ECHO OF HIS CALL** may please be sent to the address below.

आम्हांला आमची यादि अद्यावत करण्याकरिता कृपया तुमचा घरचा फोन मोबाईल फोन क्रमांक आणि ई.मेल कळवा.

Our address :

**ECHO OF HIS CALL**

10, MOHAMMED ABDULLAH 2ND STREET, CHEPAUK, CHENNAI - 600 005, INDIA
PH: (+91-44) 2852 8282, 2852 9293, 2854 7766/ Cell: (+91) 98410 71852, 95661 31858 / E.mails: sam@echoofhiscall.org / biblecor@yahoo.co.in
Websites: www.echoofhiscall.org / www.stpaulsmatriculation.org

**YOU CAN SEND YOUR DONATIONS BY ONLINE ALSO**

RNI NO. 70106/98
Postal Regn. No. :TN/CH/(C)/206/24-26
WPP NO. TN/PMG(CCR)/ WPP- 261/24-26
Date of Publication: Second week of every month
Date of Posting : 11th & 12th of every month
Posted at "Egmore RMS Patrika Channel"
on 12th JUNE 2026.
If un-delivered please return to:
**ECHO OF HIS CALL (MARATHI)**
P.O. Box No. 2957,
Chepauk, Chennai - 600 005, INDIA.
Phone: (+ 91- 44) 2852 8282, 2852 9293, 2854 7766

*JESUS LOVES YOU!*

To

*GOD BLESS YOU!*

Owned and published by **S. Sam Selva Raj** from New No. 8 & 10, Old No.18 & 19, Mohammed Abdullah 2nd Street, Chepauk, Chennai-600 005 and printed by **S. Sam Selva Raj** at **Echo of His Call Printers**, New No. 8 & 10, Old No.18 & 19, Mohammed Abdullah 2nd Street, Chepauk, Chennai-600 005. Editor: **S. Sam Selva Raj.**